औरंगाबाद Live

देशोन्नती बुधवार, दि. ५ सप्टेंबर २०१८

# मत्स्योदरी अभियांत्रिकी मध्ये व्याख्यान




प्रतिनिधी/४ सप्टेंबर

**जालना :** मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयामध्ये ता. ३ सप्टेंबर २०१८ रोजी प्रथम वर्ष अभियंत्रिकी विभागातर्फे विद्यार्थ्यांकरिता तज्ञ परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

याकरिता सिम्प्लीफाइड टेक्नॉलॉजीस फॉर लाइफ, जालना चे संस्थापक व प्रमुख निर्माता, विवेक काबरा सर ह्यांनी विद्यार्थ्यांना 'इंजिनियरिंग मध्ये संशोधन आणि नवकल्पना' या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. तसेच 'अभियांत्रिकी क्षेत्र कशाकरीता निवडावे व का?' हे सोप्या, समर्पक शब्दात विद्यार्थ्यांना समजावले. सध्या अभियांत्रिकी क्षेत्रातील आवड कमी झाली आहे, तरीही सध्या विविध क्षेत्रात अभियांत्रिकीचे प्रात्यक्षिक ज्ञान जास्त असलेल्या विद्यार्थ्यांना सुसंधी आहेत असे प्रतिपादन केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. बिरादार, प्रास्ताविक प्रा. के. व्ही. देशमुख, सूत्रसंचालन प्रा. बालाजी सूर्यवंशी व आभार प्रदर्शन प्रा. विकास कुलकर्णी यांनी केले. यावेळी सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक व प्रथम वर्ष अभियंत्रिकीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ePaper देशोन्नती Wed, 05 September 2018
deshonnati.digitaledition.in/c/